**मेळघाट परिसरात असणाऱ्या कुपोषणा संदर्भात मिशन मेळघाटची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र-०७१८/प्र.क्र.३७३/आरोग्य-७**
जी.टी.रुग्णालय आवार, १० वा मजला,
बी-विंग, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
तारीख: २८ मार्च, २०१९

<u>वाचा -</u>

**१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/कक्ष-१५/टे.क्र.१/PIL १३३/२००७/टास्क फोर्स कमिटी/शा.नि./नि.हो./न.क्र./३५३/२०१९ दिनांक २५ मार्च, २०१९.**

**२) मा.उच्च न्यायालय, मुंबई PIL १३३/२००७ बाबत दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजी झालेल्या सुनावणीचे न्यायालयीन आदेश.**

<u>प्रस्तावना -</u>

मेळघाट परिसरात असणाऱ्या कुपोषणा संदर्भात जनहित याचिका क्र. PIL १३३/२००७ बाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मिशन मेळघाट प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी याकरिता मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

मेळघाट परिसरात असणाऱ्या कुपोषणासंदर्भात मा.उच्च न्यायालयात १३३/२००७ जनहित याचिका दाखल झालेली आहे. त्या बाबत मा.उच्च न्यायालयात दि.०८.०३.२०१९ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान “मिशन मेळघाट” पुस्तिका मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सादर करण्यात आली. “मिशन मेळघाट” मध्ये वेगवेगळया विभागांच्या सहाय्याने आरोग्यामध्ये लक्षणिय सुधारणा करण्याच्या दृष्टीने मिशन मेळघाट राबविण्यासाठीचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये गंभीर माता व बालरुग्णांना संदर्भसेवा लवकरात लवकर मिळण्यासाठी उपाययोजना करणे, आरोग्य यंत्रणेची

क्षमता वाढविणे, एमबीबीएस तसेच विशेषज्ञ डॉक्टरांची उपलब्धता निश्चित करणे, आरोग्य यंत्रणेच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे, माता व बालकांच्या पोषण स्थितीमध्ये सुधारणा करणे, आरोग्य सेवा घेण्यामध्ये जतनेचा सहभाग वाढविणे तसेच स्थलांतराचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना राबविणे या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. मिशन मेळघाट प्रकल्पाची योग्य ती अंमलबजावणी व्हावी याकरिता मा.उच्च न्यायालयाने दिनांक 08.03.2019 रोजी दिलेल्या आदेशान्वये मिशन मेळघाटची योग्य ती अंमलबजावणी करण्याकरिता समितीची स्थापना करण्यात यावी असे आदेशित केलेले आहे. या टास्क फोर्स कमिटीचा उददेश सर्व विभागांनी समन्वयाने काम करुन मेळघाट भागात जास्तीत जास्त आरोग्याबाबत सोई-सुविधा उपलब्ध करुन देणे, गरोदर व स्तनदा मातांना योग्य तो आहार पुरविणे, अंगणवाडीमधून बालकांना मिळणारा आहार पोष्टिक व दर्जेदार असणे, गाव पातळीवर व्हीसीडीसी कार्यान्वित करणे व मिशन मेळघाट कृती आराखडयाची मेळघाट स्तरावर व्यवस्थित अंमलबजावणी करणे हा आहे.

त्यानुषंगाने मेळघाट आदिवासी भागात वेगवेगळया विभागांच्या सहाय्याने मिशन मेळघाट प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता समितीची स्थापना करण्यांत येत आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे:-

<u>**समितीची रचना खालीलप्रमाणे -**</u>

| | |
|---|---|
| १. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई | - अध्यक्ष |
| २. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| ३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| ४. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| ५. प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| ६. प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| ७. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| ८. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| ९. सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| १०.जिल्हाधिकारी, अमरावती | - सदस्य |
| ११.डॉ.ललित संख्ये, सहयोगी प्राध्यापक (पीएसएम),<br>सर जे.जे.वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | - सदस्य |
| १२.डॉ.नरेंद्र काकडे, सहाय्यक प्राध्यापक,<br>स्कूल ऑफ हेल्थ सिस्टीमस स्टडीज,टाटा सामाजिक संस्था,मुंबई | - सदस्य |
| १३.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई | - सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे :-**

१) मेळघाट भागात मिशन मेळघाट अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचा आढावा घेणे.

२) या योजना राबविताना सर्व संबंधित विभागामध्ये समन्वय साधण्यासाठी उपाययोजना करणे.

३) योजनेच्या अंमलबजावणीचे कार्यात्मक संनियंत्रण करणे व उपाययोजना सुचविणे.

या समितीच्या बैठका नियमित घेण्यात याव्यात व प्रकल्पाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडीअडचणीवर चर्चा करुन सर्व विभागाने समन्वयाने काम करावे.

या कमिटीतील वेगवेगळया विभागातील सदस्यांनी मिशन मेळघाट हा प्रकल्प कसा राबविला जातो याबाबत वारंवार भेटी देऊन संनियंत्रण करावे. वेगवेगळया विभागाच्या वेगवेगळया अधिकाऱ्याने दिलेल्या भेटीबाबतचा नोंदी ठेवाव्यात व भेटीचा अहवाल सादर करावा. त्याचप्रमाणे मिशन मेळघाटच्या कृती आराखडयाची अंमलबजावणी होते किंवा नाही याबाबत फेर पडताळणी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201903251649200017 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.28 15:44:00 +05'30'

**( निलेश फाळके )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.महासंचालक, राजमाता जिजाऊ पोषण मिशन, महिला व बाल विकास,मंत्रालय,मुंबई.
१२.आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
१३.उप सचिव (आरोग्य-७), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
१५.आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
१६.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१७.जिल्हाधिकारी, अमरावती.
१८.ललित संख्ये, सहयोगी प्राध्यापक (पीएसएम), सर जे.जे.वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
१९.डॉ.नरेंद्र काकडे, सहाय्यक प्राध्यापक, स्कूल ऑफ हेल्थ सिस्टीमस स्टडीज,टाटा सामाजिक संस्था, मुंबई.
२०.निवडनस्ती आरोग्य-७.